# मिरा भाईंदर महानगरपालिका
## सार्वत्रिक निवडणूक – २०२५-२६

## // प्रेस नोट //

➢ **मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत सार्वत्रिक निवडणूक – २०२५-२६ करिता कार्यरत असलेल्या शासकीय / निमशासकीय कर्मचारी यांना "टपाली मतदानाची सुविधा" उपलब्ध.**

सार्वत्रिक निवडणूक – २०२५-२६जाहीर झाली असून निवडणूकीची अंमलबजावणी यशस्वीरित्या पार पाडण्याकरीता प्रभागनिहाय निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या अधिपत्याखाली अधिकारी / कर्मचारी यांची नेमणूक करण्यांत आलेली आहे. सदर नेमणूक केलेल्या कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना मतदान करता यावे याकरीता मिरा भाईंदर महानगरपालिका, मा. आयुक्त तथा निवडणुक अधिकारी राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली कर्तव्य बजावित असलेल्या शासकीय/निमशासकीय विभागांचे कर्मचारी यांना टपाली मतदानाची सुविधा महापालिकेमार्फत उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाकडून जाहिर आवाहन करण्यांत येत आहे की, मिरा भाईंदर सार्वत्रिक निवडणूक -२०२५-२६ करीता कर्तव्य बजावित असलेले सर्व संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना टपाली मतदानाचा हक्क बजावण्याकरीता आवश्यक असलेला विहित नमुना (PB-१) अर्ज दिनांक ०८ जानेवारी २०२६ पर्यंत (सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.०० पर्यंत) खालील ठिकाणी उपलब्ध करुन दिला आहे. तरी सर्वांनी मतदानाचा हक्क बजावावा.

१) निवडणूक निर्णय अधिकारी क्र. १ ते ७ यांचे कार्यालय.
२) दि. ०५/०१/२०२६ व दि. ०६/०१/२०२६ रोजी स्व. लता मंगेशकर नाट्यगृह.
(प्रशिक्षणाच्या दिवशी, प्रशिक्षण वेळेत)
३) टपाली मतदान मदत कक्ष, पत्रकार कक्षाशेजारी, तळमजला मिभामनपा मुख्य कार्यालय.

**सहाय्यतेसाठी संपर्क क्रमांक :-** १) श्री. हर्षल संखेः- ९६३७००५७६०
२) श्री. रविंद्र दरोडाः- ९९२१७७२७६४
३) टपाली मतदान मदत कक्षः- २८१९२८२८-२०८
pbmbmcelection@gmail.com हे संकेत स्थळ निश्चित करण्यात आले आहे.